औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहत संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापन करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपययोजना करण्याकरिता गठीत समितीस मुदतवाढ देणेबाबत व समिती सदस्य सचिव श्री. अनिलकुमार दाबशेडे, यांच्याऐवजी श्री. मिलिंद आकरे यांची नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः औद्योस-१०१७/प्र.क्र.२१६/९-स
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: - ०८ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा :-</u>

१. सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांकः औद्योस-१०१७/प्र.क्र.२१६/९-स, दि. २९.११.२०१७
२. श्री. उत्तम इंदलकर, अध्यक्ष औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहत संस्था अभ्यासगट यांचे पत्र क्र. औ.सह.संस्था समिती/१/२०१८,दि.२२.०१.२०१८
३. श्री. उत्तम इंदलकर, अध्यक्ष औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहत संस्था अभ्यासगट यांचे पत्र क्र. औ.सह.संस्था समिती/३/२०१८,दि.२९.०१.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहत संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यामापन करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता वाचा मधील क्र. १ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीस आपला अहवाल सादर करण्याकरिता ६० दिवसांचा कालावधी देण्यात आलेला होता. सदर कालावधी दि. २७.०१.२०१८ रोजी संपुष्टात येणार आहे. तद्नुषंगाने सदर समितीस अहवाल सादर करण्याकरिता दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत वाचा मधील क्र. २ च्या पत्रान्वये अध्यक्ष, औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहत संस्था अभ्यासगट यांनी शासनास विनंती केली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नसल्यामुळे, समितीस २ महिन्याची मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

सदर समितीमध्ये श्री. अनिलकुमार दाबशेडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर हे सदस्य सचिव आहेत. परंतु त्यांना कर्जमाफी व इतर कामकाज असल्याने तसेच, समितीचे सदस्य सचिव व अध्यक्ष वेगवेगळया ठिकाणी पदावर असल्यामुळे समिती कामकाज वेळेत करण्यासाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे समिती कामकाजासाठी करावा लागणारा पत्रव्यवहार आदी बाबी संबंधीतांना करणे शक्य नाही. त्यामुळे श्री. अनिलकुमार दाबशेडे यांच्याऐवजी सदस्य सचिव म्हणून श्री. मिलिंद आकरे, सहनिबंधक, औद्योगिक वसाहत यांची नियुक्ती करण्याबाबत वाचा मधील क्र. ३ च्या पत्रान्वये अध्यक्ष, औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहत संस्था अभ्यासगट यांनी शासनास विनंती केली आहे. त्यानुसार सदर समितीच्या सदस्य सचिव पदावर श्री. अनिलकुमार दाबशेडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याऐवजी श्री. मिलिंद आकरे, सहनिबंधक, औद्योगिक वसाहत यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहत संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापन करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपययोजना करण्याकरिता सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दि.२९.११.२०१७ नुसार गठीत समितीस आपला अहवाल/ शिफारशी सादर करण्याकरिता **दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे**.

२. तसेच, सदर समितीच्या सदस्य सचिव पदावर श्री. अनिलकुमार दाबशेडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याऐवजी **श्री. मिलिंद आकरे, सहनिबंधक, औद्योगिक वसाहत यांची नियुक्ती करण्यात येत आहे.**

३. वरील सुधारणे व्यतिरिक्त शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती कायम आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०८११२२३०६५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra
Shantaram Pujari

Digitally signed by Mahendra Shantaram Pujari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=CMTD DEPARTMENT, postalCode=400012,
st=Maharashtra,
2.5.4.20=16153bd1d85632a421d5a5fd23bf5e5b
b624d27f2c8cf59fb17e3ead3a034dbc,
cn=Mahendra Shantaram Pujari
Date: 2018.02.08 11:30:40 +05'30'

(महेंद्र पुजारी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा. मंत्री (सहकार) व मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२.मा. अ.मु.स. (सहकार), यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
३.उप सचिव (पणन विभाग) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
४.सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५.सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
६.सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
७.श्री. उत्तम इंदलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य सहकारी संघ, मुंबई.
८.श्री. राजेश सुरवसे, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.
९.श्री. महेश कदम, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा.
१०.श्री. अनिलकुमार दाबशेडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.
११.श्री. मिलिंद आकरे, सहनिबंधक, औद्योगिक वसाहत
१२.श्री. शिवाजी शंकर पोळ, अध्यक्ष शिवसदन सहकारी सोसायटी लि. सांगली.
१३.निवडनस्ती/९-स.